अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र.२२/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ५४४३ दि. ३१/१०/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२२/२०१९

**श्री अमित रतीलाल कदम**
६०/२ अ, पर्वती दर्शन,
पुणे ९

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

**१)जन माहिती अधिकारी तथा** , उप अभियंता
मालमत्ता व व्यवस्थापन विभाग,पुणे महानगरपालिका
२) जन माहिती अधिकारी तथा विभागिय अतिक्रमण अधिकारी,
अतिक्रमण व अनधिकृत बाधकाम निर्मुलन विभाग,पुणे महानगरपलिका
३) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
भू-संपादन व व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका
४)जन माहिती अधिकारी ,
उद्यान विभाग, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

**श्री अमित कदम, रा. ६०/२ अ, पर्वती दर्शन, पुणे-९.** (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ०८.०७.२०१९ रोजी अर्ज करून "पुणे मनपा मध्ये विविध विभागात कार्यरत असणाऱ्या व त्यांच्या जागेवरील (ताब्याची) अतिक्रमण निर्मुलनची जबाबदारी बाबत कर्तव्य सुपुर्दी करणारे आदेशाबाबत सन २०१० ते आजपर्यंत (अंदाजे) पुणे मनपा मध्ये विविध विभागात कार्यरत असणाऱ्या अतिक्रमण निर्मुलनाची कर्तव्य जबाबदारीबाबत कर्तव्य सुपुर्दी करणारे डयुटी लिस्ट दस्त मिळावेत/बाधकाम/भूमीप्रापण/मालमत्ता व्यवस्थापन/अतिक्रमण/उद्यान यामध्ये जागेची मालकी ज्या विभागाची आहे.त्याबाबत जबाबदारी निश्चित केली आहे. याबाबतची माहिती मिळावी." अशी वरीलप्रमाणे माहिती मागितलेली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता व व्यवस्थापन विभाग,पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. माव्य/२९०२,२९०३,२९०४, दि.२२/०७/२०१९ ने भू-संपादन व व्यवस्थापन विभाग, अतिक्रमण व अनधिकृत बाधकाम निर्मुलन विभाग ,उद्यान विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पत्र पाठविले आहे.

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, भू-संपादन व व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.lamlo/७९१, २९/०७/२०१९ ने अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा बोध होत नाही. त्यामुळे माहिती देणे अडचणीचे आहे,असे उत्तर देण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक, (अतिक्रमण व अनधिकृत बाधकाम निर्मुलन विभाग), पुणे महानगरपलिका यांनी जा.क्र.ई/१७८९, दि.०२/०८/२०१९ ने अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती पुणे महानगरपलिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे उत्तर देण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी, उद्यान विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.उकाजा/२६०७, दि.०१/०८/२०१९ने अपिलार्थी यांना महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम कलम -४५८(३६) नुसार, सार्वजनिक उद्याने, बागा यांचे नुकसान किंवा गैरवापर होवू नये म्हणून उद्यान विभागामार्फत संरक्षण करण्याची व्यवस्था करणेत येत असते, असे उत्तर देण्यात आलेले आहे. वरील सर्व विभागांनी पत्राची पोच सादर केली नाही.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०८.०७.२०१९ | १०.०७.२०१९ | ०७.०८.२०१९ | १)जा.क्र.माव्य/२९०२,२९०३, २९०४, दि.२२/०७/२०१९ने मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने सबंधित विभागांना पत्र दिले.<br>२) जा.क्र.lamlo/७९१, २९/०७/२०१९ ने भू-संपादन व व्यवस्थापन विभागाने उत्तर दिले.<br>३) जा.क्र.ई/१७८९, दि.०२/०८/२०१९ ने अनधिकृत बाधकाम निर्मुलन विभागाने उत्तर दिले.<br>४)जा.क्र.उकाजा/२६०७,दि.०१/०८/२०१९ने उद्यान विभागाने उत्तर दिले. | -<br>- |

अपिलार्थी यांचे सबंधित विभागाकडील जन माहिती अधिकारी पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी अपील क्र. २२/२०१९ चा अपील अर्ज दि. ११.०९.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ११.०९.२०१९ | ११.०९.२०१९ | ३१/०८/२०१९ | नाही<br>विलंब ११ दिवस | नाही |